<u>**अर्जदार तर्फे श्री.एस.व्ही.देशमुख यांच्यामार्फत सरतपास सुरु.**</u>

**६.** आता मला लगतचे सर्वाधिकारपत्र दाखविले. त्यातील मजकूर बरोबर आहे . त्यावर माझी सही व कोंडाबाई हासुळे यांचा अंगठा आहे. दोन साक्षीदारांच्या सहया आहेत. ते नोटराईझड आहे.

**उलटतपास अर्जदारतर्फे श्री.व्ही.एस.शेळके यांच्यामार्फत सुरु.**

**७.** हे खरे की, अर्जदार ही माझी सख्खी बहीण आहे. आमचे वडील दत्तात्रय दि.३१/०५/२००३ रोजी मयत झाले. हे खरे की, कोंडाबाई ही आमची आई आहे. हे खरे की, कोंडाबाई व दत्तात्रय यांचा विवाह १९५१ पूर्वीचा आहे. हे खरे की, कोंडाबाई व दत्तात्रय यांची आमच्या गावी पती व पत्नी अशी नोंद आहे. हे खरे की, त्यावेळी हरीबाई आणि विजयाबाई या दत्तात्रयसोबत विवाहीत नव्हत्या. हे खरे की, १९५६ पर्यंत सुध्दा विजयाबाई आणि हरीबाई या दत्तात्रयच्या पत्नी नव्हत्या. हे खरे की, दत्तात्रयच्या मृत्यूनंतर अर्जदार व जाबदार क्रं. १ व २ हे दत्तात्रयचे वारस आहेत. दत्तात्रय यांचे पिंडदान आणि श्राध्द मी केले आहे. हे खरे की, या विधीला अर्जदार सोबत होती. हे खरे की, कोंडाबाई हयात असताना दत्तात्रय यांनी विजयाबाई व हरीबाई यांच्याशी विवाह केला.

**८.** हे खरे की, १९३० ते १९५५ पर्यंत ग्रामपंचायती व ग्रामीण रुग्णालयांची उभारणी झाली नसल्याने जन्म मृत्यूच्या नोंदी अंदाजाने होत्या. हे खरे की, हरीबाई आणि विजयाबाई या आजारपणात मयत झाल्या. हरीबाई व विजयाबाई यांच्यापेक्षा कोंडाबाई या वयाने जेष्ठ आहेत हे म्हणणे खरे आहे. हे खरे की, अर्जदारचा विवाह जाबदार क्रं. ३ च्या विवाहापूर्वी झालेला आहे. हे खरे की, अर्जदारची अपत्ये ही जाबदार क्रं.३ च्या अपत्यांपेक्षा ७ ते ८ वर्षांनी मोठे आहेत. जमीन गट क्रं. १८२ माझ्या ताब्यात आहे. हे खरे की, गट क्रं.रं. १८२ हा दत्तात्रय यांचा वडीलोपार्जित गट क्रं आहे. हे खरे की, गट क्रं.१८२ हा विजयाबाई यांना माहेरातील लोकांकडून मिळालेला नसून दत्तात्रयकडून मिळालेला आहे. हे खरे की, त्यामुळे या गटाचा उतारा विजयाबाईच्या नावे आहे. हे खरे की, विजयाबाई यांना मुलबाळ नसल्याने त्यांच्या मिळकतीचे मालक

अर्जदार व जाबदार क्रं. १ व २ आहेत.

**९.** हे खरे की, दत्तात्रय मृत्यू झाल्यानंतर हा अर्ज दाखल करेपर्यंत अन्य कोणीही वारसा दाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला नाही. दत्तात्रय मयत झाल्यानंतर जाबदार क्रं.१ ते ३ यांनी वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज का केला नाही याचे कारण म्हणजे ही जमीन विजयाबाई यांना खाण्यासाठी दिली होती. एकाच वेळी सर्व जमीनीची वाटणी व्हावी म्हणून आम्ही असा अर्ज केला नव्हता. हरीबाईचा वारस केशव म्हणजे जाबदार क्रं. ३ आहे. अर्जदार व जाबदार क्रं. १ व २ यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास माझी हरकत नाही. १९५० पासून ते आजपर्यंत आमच्या गावात वेगवेगळया मतदारयादया तयार झालेल्या आहेत हे म्हणणे खरे आहे. या प्रत्येक यादीमध्ये अर्जदार व जाबदार यांच्या वयामध्ये तफावती आहेत किंवा कसे हे मी पाहिले नसल्याने मला सांगता येत नाही. दि.०१/११/२००१ ची भाग क्रं.१४ मौजे शेलदरा गावची मतदारयादी नि.क्रं.७० आता मला दाखविली त्यामध्ये अनु.क्रं.७५ ते ७९ व ८१ यात नमूद व्यक्तीची वय आहेत हे म्हणणे खरे आहे. नि.क्रं. ६२ या दि.२१/०१/२०१७ रोजीच्या मतदारयादीत पान.क्रं.३२६ यातील हासुळे हरीबाई दत्तात्रय, हासुळे कोंडाबाई दत्तात्रय, हासुळे विजयाबाई दत्तात्रय, हासुळे केशव दत्तात्रय यांची वयामध्ये फरक आहे. हे खरे की,दत्तात्रयची पत्नी म्हणून कोंडाबाई यांचेच नाव विधी व समारंभात यायचे. पहिल्या पत्नीचा मान कोंडाबाई यांनाच होता. सन २००८-२००९ सालापासून मी अहमदपूर येथे व जाबदार क्रं. ३ हे शेलदरा येथे राहते. अर्जदारचे शाळेत प्रवेशाचे वय अंदाजाने दाखविलेले आहे. अर्जदारची जन्मतारीख दि.०१/०१/१९५६ अशी आहे व ती माझ्यापेक्षा वयाने मोठी आहे हे म्हणणे खरे आहे. जाबदार क्रं. ३ हा अर्जदारपेक्षा वयाने लहान आहे याबद्दल मला माहिती नाही. हे खरे की, अहमदपूरला मी राहण्यासाठी आल्यानंतर गावच्या नोंदी वगैरे जाबदार क्रं. ३ बघत असे. याप्रकरणी जाबदार क्रं. ३ याने लेखीजबाब काय दिला हे मला माहित नाही. जाबदार क्रं. ३ याने अर्जदार ही वारस नव्हे अशा आशेने दिलेला जबाब खोटा आहे.

**अर्जदारसाठी उलटतपास पूर्ण.**

दिवाणी.कि.अर्ज क्र.७१९/२०२२
अन्नपुर्णाबाई वि. कोंडाबाई
सामनेवाला क्रं.१ व २ तर्फे सा.क्र.१ **(नि.क्र.७४ )**

**जाबदार क्रं. ३ तर्फे उलटतपास श्री. डी.एल.घोगरे यांच्यामार्फत सुरु.**

**१०.** मी शिक्षक म्हणून कार्यरत आहे. सन १९९९ पासून मी नौकरी करतो. माझ्या नोकरी लागण्याच्यावेळी शाळेचा निर्गम उतारा हा माझ्या वयाचा दाखला होता. माझ्या निर्गम उता-याचे जन्मतारखेच्या नोंदी अचूक आहेत.

**उलटतपास तहकूब.**

**सरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष
स्वाक्षरीत/-
(एस.एन.सरडे)

**दिनांक २१/०८/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व. स्तर,**
**अहमदपूर.**